# महाराष्ट्र शासन - सार्वजनिक आरोग्य विभाग
## राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,
डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

उपसंचालक आरोग्य सेवा
(आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक
(जन्म व मृत्यू) महाराष्ट्र राज्य पुणे-१

संकेतस्थळ - arogya.maharashtra.gov.in
कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०
कायदा विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०
नानोप विभाग ☎ :- ०२० - २६०५८२९२
ई-मेल crs_d83@yahoo.com


**आरोग्य सेवा**

जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/ बाळाचे नाव समावेश /        /२१
दिनांक:- १२/०५/२०२१

5253-5328
12-05-2021

प्रति,

१) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा,
निबंधक जन्म मृत्यू, बृहन्मुंबई महानगरपालिका,
"एफ" साऊथ वॉर्ड, परेल, मुंबई- ४०००१२.

२) आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु
महानगरपालिका ............ (सर्व)

३) जिल्हा आरोग्य अधिकारी, तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यू,
जिल्हा परिषद .............(सर्व).

विषय :- जन्म नोंदणीमध्ये बाळाच्या नावाचा समावेश करणेबाबत.

संदर्भ :- १) सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे पत्र क्र. जमृनो-२०२०/७२४/प्र.क्र. ३२६/कुक दिनांक १०/०५/२०२१.
२) महाराष्ट्र शासन राजपत्र एप्रिल २८,२०२१/वैशाख ८, शके १९४३. वर्ष ७. अंक ५३.

जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १४ व महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम १० नुसार जन्म नोंदणीमध्ये जन्म नोंदणी मध्ये जन्म नोंदणी दिनांकापासून १५ वर्षाच्या आत बाळाच्या नावाची नोंदणी करता येते.

काही घटनांच्या बाबतीत वरील कलमर्यादा उलटून गेल्यावर देखील बाळाच्या नावाची नोंदणी करावयाचे राहून गेले होते. यास्तव शासनाने यापूर्वी ३ वेळा बाळाच्या नावाची नोंद करण्यासाठी मुदतवाढ दिली होती, हा कालावधी पुढील प्रमाणे आहे.

१. २६/१०/२००५ - २५/१०/२००७
२. ०१/०१/२०१३ - १३/१२/२०१४
३. १५/०५/२०१५ - १४/०५/२०२०.

अशी मुदतवाढ देऊन देखील राज्यातील काही घटनांच्या बाबतीत अजूनदेखील बाळाच्या नावाची नोंद करवयाची राहून गेली आहे. अशा बाबतीत बाळाचे नाव समाविष्ट करण्यासाठी आता उपरोक्त संदर्भिय अधिसूचनेद्वारे शासनाकडून अखेरची मुदतवाढ देण्यात आली आहे. <u>या कालावधीनंतर जन्म नोंदणीत बाळाचे नाव समाविष्ट करता येणार नाही</u> याची सर्व निबंधक, जन्म व मृत्यू यांनी नोंद घ्यावी. त्या अनुषंगाने याबाबत

उपलब्ध योग्य त्या मध्यमातून प्रसिद्धी देण्यात यावी, ज्यायोगे ज्या जुन्या जन्म नोंदीत बाळाचे नाव नाही त्यामध्ये बाळाच्या नावाची नोंद करता येईल.

या कालावधीमध्ये जन्म नोंदणीत नाव समाविष्ट करण्यासाठी मार्गदर्शक सूचना.

१. अधिसूचनेत नमूद केल्यानुसार ज्या जन्म घटनांमध्ये बाळाच्या नावाची नोंद नसेल त्या नोंदीमध्ये बाळाचे नाव अधिसूचना प्रसिद्ध होण्याच्या दिनांकापासून ५ वर्षापर्यंत समाविष्ट करता येईल (दिनांक २७ एप्रिल २०२६ पर्यन्त)

२. नाव समाविष्ट करण्यासाठी बाळाच्या पालकांकडून अथवा ज्या व्यक्तीचे नाव समाविष्ट करावयाचे आहे त्यांचेकडून अर्ज घेण्यात यावा.

३. नावाच्या शाबीतीकरिता पुढीलपैकी कोणत्याही २ (दोन) शासकीय पुराव्यांच्या स्वसाक्षांकीत प्रती घ्याव्यात. उदा. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र, पॅनकार्ड, मतदार ओळखपत्र, आधारकार्ड, वाहन परवाना, शासकीय कार्यालयातील कर्मचारी असल्यास त्या कार्यालयाचे ओळखपत्र.

४. बाळाचे संपूर्ण नाव लिहण्याबाबत आग्रह धरण्यात यावा.

५. काही धर्मांमध्ये आई-वडील यांचे आडनावपेक्षा बाळाचे आडनाव वेगळे ठेवण्याचे प्रथा असते. तसेच बाळाच्या संपूर्ण नावात मधले नाव वडिलांच्या नावपेक्षा वेगळे असते अशा प्रकरणात संबंधितांकडून अर्जामध्ये तसा स्पष्ट उल्लेख नमूद करून घेण्यात यावा.

६. बाळाचे नाव जन्म नोंदणीत समाविष्ट केल्यानंतर 'शेरा' रकान्यात या परिपत्रकाचा व अधिसूचनेचा क्रमांक आणि दिनांक नमूद करून निबंधक/ उपनिबंधक, जन्म व मृत्यू यांनी स्वाक्षरी करून दिनांक नमूद करावा. अर्जदारास नावासह जन्म प्रमाणपत्र अदा करावे.

७. जन्म नोंदणीत बाळाचे नाव समाविष्ट करण्यासाठी संबंधितांकडून घेतलेला अर्ज कायमस्वरूपी जतन करावा.

८. बाळाच्या नावाची नोंद करण्यासाठी सर्व स्तरावरील निबंधकांनी नागरिकांना आवाहन करण्यास्तव उपलब्ध सर्व योग्य त्या माध्यमांमधून व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी. यामध्ये यानंतर नावाच्या समावेशासाठी पुन्हा मुदतवाढ मिळणार नाही असे स्पष्ट नमूद करावे.

सदरचे परिपत्रक आपले अधिनस्त सर्व निबंधक/ उपनिबंधक यांना देण्यात यावे.

दिनांक २७ एप्रिल २०२६ या तारखेनंतर हा कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

सोबत - अधिसूचनेची मराठी व इंग्रजी प्रत

(डॉ. जी. एम. गायकवाड)
उपसंचालक आरोग्य सेवा, (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक, जन्म व मृत्यू,
महाराष्ट्र राज्य, पुणे – १.

प्रत महितीस्तव सादर :-

१) मा. अप्पर मुख्य सचिव. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई- १.

२) मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, रा.आ.अ. आरोग्य सेवा आयुक्तालय आरोग्य भवन, मुंबई.

३) मा. संचालक, जनगणना, जनगणना कार्यालय, एक्सचेंज इमारत, बेलॉर्ड इस्टेट, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

४) मा. संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म मृत्यू, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

५) मा. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, पुणे.

प्रत :- उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे ............ (सर्व) - यांना मंडळांतर्गत जिल्ह्यांना पाठपुरवयसाठी.

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक ५३] बुधवार, एप्रिल २८, २०२१/वैशाख ८, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ११५

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले

(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### सार्वजनिक आरोग्य विभाग

१० वा मजला, गो. ते. रुग्णालय, संकुल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१, दिनांक २८ एप्रिल २०२१

### अधिसूचना

**जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९.**

क्रमांक जमृनों-२०२०/७२४/प्र.क्र. ३२६/कु.क..— जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ (१९६९ चा १८) च्या कलम ३० चे उप-कलम (२) च्या खंड (ख) आणि कलम १४ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन केंद्र शासनाच्या मान्यतेने महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी नियम, २००० मध्ये याद्वारे खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :–

१. या नियमांना महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी (सुधारणा) नियम, २०२१ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी नियम, २००० च्या नियम १० मधील उप-नियम (१) च्या परंतुकामध्ये "(एक) जर त्यांची नोंदणी " या वाक्यापासून सुरू होणाऱ्या व " अधीन राहून निबंधक " या वाक्याच्या ठिकाणी संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढीलप्रमाणे बदल समाविष्ट करण्यात येत आहे.–

" जर त्यांची नोंदणी,–

(एक) जन्म व मृत्यू नोंदणी नियम, २००० च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी जर नोंदणी केली असेल तर महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी (सुधारणा) नियम, २०२१ प्रसिद्ध करण्याच्या वेळी ज्या प्रकरणांना पंधरा वर्ष पूर्ण झालेली आहेत अशा प्रकरणांसाठी आणखी पाच वर्षांचा कालावधी देण्यात येईल, किंवा

(दोन) महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी (सुधारणा) नियम, २०२१ च्या प्रारंभाच्या दिनांकानंतर जर नोंदणी केली असेल तर कलम २३ च्या उप-कलम (४) च्या तरतुदींच्या अधीन राहून अशा नोंदणीच्या दिनांकापासून निबंधक,– "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व. मुं. भरोसे,**
शासनाचे उप सचिव.

**PUBLIC HEALTH DEPARTMENT**

10th Floor, G. T. Hospital, Complex Building,
New Mantralay, Mumbai 400 001, dated the 28th April 2021

*NOTIFICATION*

REGISTRATION OF BIRTH AND DEATHS ACT, 1969.

No. JAMRUNO-2020/724/C.R.326/F.W.—In exercise of the powers conferred by clause *(b)* of sub-section (*2*) of section 30 read with section 14 of the Registration of Births and Deaths Act, 1969 (18 of 1969), the Government of Maharashtra with the approval of the Central Government, hereby makes the following rules further to amend the Maharashtra Registration of Births and Deaths Rules, 2000, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Registration of Births and Deaths (Amendment) Rules, 2021.

2. In rule 10 of the Maharashtra Registration of Births and Deaths Rules, 2000 in sub-rule *(1)*, in the proviso, for the portion beginning with the words "which shall be reckoned" and ending with the words " the Registrar shall " the following shall be substituted, as follows, namely :–

"which shall be reckoned,–

(*i*) in case where the registration has been made prior to the date of commencement of the Registration of Births and Deaths Rules, 2000, further five years period shall be given, in respect of those cases, where fifteen years period has been completed at the time of publication of the Maharashtra Registration of Births and Death (Amendment) Rules, 2021, or

(*ii*) in case where the registration is made after the date of commencement of the Maharashtra Registration of Births and Deaths (Amendment) Rules, 2021 from, the date of such registration, subject to the provisions of sub-section *(4)* of section 23, and the Registrar shall,–"

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. M. BHAROSE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.